


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २९७, बुधवार १४ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# विधानसभा जिंकण्यासाठी एकसंघ व्हा!

## ■ काशिनाथ दाते यांची महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना साद ■ पारनेर येथे महायुतीच्या कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा

पारनेर : प्रतिनिधी

**लवकरच विधानसभेची निवडणूक होणार असून पारनेर मतदारसंघात महायुतीचा उमेदवाराला विजयी करण्यासाठी सर्वांनी एकसंघ होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे मा. सभापती काशीनाथ दाते यांनी केले.**

आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर मंथन करण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा आढावा घेऊन त्या तळागाळापर्यंत पोहचल्या किंवा नाही याची माहीती घेण्यासाठी पारनेर शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात महायुतीच्या घटक पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यात दाते यांनी उपस्थितांशी संवाद साधला.मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, तालुक्याच्या राजकारणात वेगळा पायंडा पडत आहे. तालुक्याची राजकीय संस्कृती बिघडली आहे. त्यास तालुक्याची संस्कृती बिघडविणारे लोकप्रतिनिधी हे जबाबदार असून सर्वांनी आक्रमक भूमिका घेऊन काम करणे गरजेचे आहे. शंकरराव काळे यांच्यापासून मा. आ. बाबासाहेब ठुबे, नंदकुमार झावरे, वसंतराव झावरे, विजयराव औटी, यांच्या काळातील वैचारिक बैठक आता तालुक्यात राहिली नाही. ही संस्कृती बिघडविण्याचे काम सुरू आहे. सहकार संपविण्याचे काम सुरू आहे. तालुका वाचविण्यासाठी आपण सर्वांनी एकसंघ राहिले पाहिजे अशी साद दाते यांनी यावेळी बोलताना घातली.

यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, जि प चे मा. उपाध्यक्ष सुजित झावरे,शिवसेनेचे तालुकाप्रमख विकास रोहोकले, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी थोरात, वसंत चेडे, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, सोनाली सालके, सचिन वराळ, दिनेश बाबर, नगरसेवक, अशोक चेडे, पै. युवराज पठारे, मनोज मुंगसे, लहू भालेकर, अमोल कर्डीले, खरेदी विक्री संघाचे संचालक सुनील पवार, प्रमोद कावरे, संजय मते, प्रशांत शितोळे, ॲड. बाबासाहेब खिलारी, सागर मैड, शिवाजी खिलारी, संतोष शेलार, किरण कोकाटे, संग्राम पावडे, शिवाजी रोकडे, सुभाष दुधाडे, डॉ. अजय येणारे, बाळासाहेब रेपाळे, भाउसाहेब टेकुडे, वसंत मोरे, सुभाष सासवडे, कैलास नऱ्हे, संदीप औटी, रामचंद्र थोरात, गंगाराम कळमकर, सुभाष करंजुले, लहू रावडे, विकास रावडे, साहेबराव वाफारे, संजय बोरूडे, सावकार लांडे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.


■ पारनेर तालुक्यातील महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या संवाद मेळाव्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या तालुकाध्यक्षपदी सुनील थोरात यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

### श्रेष्ठींचा निर्णय शिरोधार्ह

पारनेर-नगर विधानसभा लढविण्यासाठी आपण उत्सुक आहोत. मात्र महायुतीचे श्रेष्ठी जो निर्णय घेतील, जो उमेदवार देतील त्या उमेदवारासोबत राहून त्यास विजयी करण्यासाठी आपण परीश्रम घेणार आहोत.

सुजित झावरे पाटील
मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद

### त्यांनी मतदारांची फसवणूक केली

लोकसभा निवडणूकीत समोरच्या उमेदवाराने चुकीच्या पध्दती प्रचार करून मतदारांची मने वळविण्याचा प्रयत्न केला. मतदारांची फसवणूक केली. त्यांना यापुढील निवडणूकांमध्ये मतदार नक्कीच जागा दाखवून देतील.

राहुल शिंदे पाटील, तालुकाध्यक्ष, भाजपा

### वीज बील माफ योजना भविष्यातही

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी वीज माफी योजना राबविण्यात येत असून यापुढील काळातही वीज बील माफ योजना राबविण्यात येईल असे सुनील थोरात यांनी सांगितले.

### डॉ. विखे यांच्या पराभवाचे मंथन

महायुतीच्या या बैठकीत खा. डॉ. सुजय विखे यांच्या लोकसभा निवडणूकीत झालेल्या पराभवावर मंथन करण्यात आले. या निवडणूकीत झालेल्या चुकांचा बोध घेऊन विधानसभा निवडणूकीत पक्ष संघटनेमध्ये व महायुतीमध्ये कशा पध्दतीने समन्वय ठेउन नियोजन करून निवडणूक कशी जिंकता येईल यावर चर्चा करण्यात आली. विधानसभा निवडणूक लढविण्याच्या रणनितीवरही यावेळी प्राथमिक चर्चा करण्यात आली.

### दुधाला अनुदान, पीकांना विमा

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दुधाला दरवाढ देऊन तसेच पाच रूपये अनुदान जाहिर केले असून हे अनुदान कायमस्वरूपी सुरू राहणार आहे. ही योजनाही पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावी. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सोयाबीन व कापूस या पिकांसाठी पिक विमा मंजुर केल्याचेही सुनील थोरात यांनी सांगितले.

### रथाच्या माध्यमातून जनजागृती

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना तळागाळापर्यंत पोहचली पाहिजे. सर्व महिलांना त्याचा लाभ मिळाला पाहिजे. कोणतीही भगिनी या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी सरपंच, चेअरमन तसेच महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी काळजी घ्यावी. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या जनजागृतीसाठी खास रथ तयार करण्यात येऊन गावोगावांना भेटी देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेसाठी मुख्यमंत्री युवा कौशल्य प्रशिक्षणांतर्गत प्रत्येक गावासाठी एक दुत नेमण्यात येणार आहे. त्यासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून होतकरू तरूणास संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

सुनील थोरात, अध्यक्ष, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना समिती

### तर बहिणीच्या पाठीशी उभे रहा !

विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी महायुतीकडून अनेक जण इच्छुक आहेत. एकमताने उमेदवार निवडण्याचा निर्णय झाला असून तुमच्यात एकमत न झाल्यास मी देखील निवडणूक लढविण्यास उत्सुक असून बहिणीच्या पाठीशी तुम्ही सगळे भाऊ उभे रहा.

अश्विनी थोरात, जिल्हाध्यक्ष भाजपा महिला आघाडी

### राज्य सरकारच्या विविध योजना

तालुक्यातील वयोवृध्द नागरीकांसाठी मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना प्रभावी राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या माध्यमातूनही वृध्दांना विविध साहित्याचे वितरण करण्यात येत आहे. सौर उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी सौर उर्जा पंप देण्याचा निर्णय देखील राज्य सरकारने घेतला असल्याचे सुनील थोरात यांनी सांगितले.

### बैठकीची जबाबदारी थोरातांवर

महायुतीच्या सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांची एकत्रीत बैठक घेऊन विचारमंथन करण्याची जबाबदारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांच्यावर सोपविली होती. त्यानुसार थोरात यांनी या बैठकीचे आयोजन करून पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देईल त्या उमेदवारास विजयी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

### लाडकी बहिण योजना प्रभावी राबविणार

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या तालुकाध्यक्षपदी निवड केल्याबद्दल सुनील थोरात यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार,पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे, जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी टाकलेल्या विश्वासास पात्र राहून तालुक्यातील प्रत्येक भगिनीस या योजनेचा लाभ मिळवून देत ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल.

सुनील थोरात, तालुकाध्यक्ष, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना

# खा. सावंत यांचे खा. लंके यांच्याकडून स्वागत

## शिवसेना उबाठा पक्षाकडून निवडणूकीसंदर्भात आढावा

नगर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर नगर दौऱ्यावर आलेले महाविकास आघाडीचे नेते व शिवसेना खासदार अरविंद सावंत यांची खासदार नीलेश लंके यांनी भेट घेउन त्यांचे नगर जिल्ह्यात स्वागत केले.**



विधानसभा निवडणूकीसंदर्भात आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी खा. अरविंद सावंत, उपनेते संजय घाडी हे नगरमध्ये दाखल झाल्यानंतर खा. लंके यांनी त्यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख, इतर पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

# ...तर लाडकी बहीण योजनेवर बंदी घालणार !

## सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची चर्चा दिसून येत आहे. त्यातच या योजनेची चर्चा सर्वोच्च न्यायालयात देखील झाली. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात राज्य सरकारला चांगलेच फटकारले आहे. इतकेच नाही तर लाडकी बहीण योजनेसाठी तुमच्याकडे पैसे आहेत, मात्र याचिकाकर्त्यांना मोबदला देण्यासाठी पैसे नाहीत का? असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने विचारला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला या प्रकरणी फटकारले आहे. तसेच या योजनेवर बंदी घालण्याचा इशाराही दिला आहे.**



१९५० सालचे पुण्याजवळील २४ एकर जमिनीचे हे प्रकरण असून या प्रकरणात याचिकाकर्त्यांला अद्याप मोबदला मिळाला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र ही जमीन केव्हाच राज्य सरकारने संरक्षण विभागाला हस्तांतरित केली आहे. तरी देखील याचिकाकर्त्यांला मोबदला न मिळाल्याने सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची खरडपट्टी काढली आहे. या भूसंपादनासंदर्भात राज्य सरकार काय निर्णय घेणार ते उद्या दुपारपर्यंत आम्हाला सादर करा. नसता तुमच्या लाडक्या बहिणी योजनेवर बंदी घालण्याचा गंभीर इशाराच उर्वरीत पान ३ वर

# नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी ५ वर्षे

## ■ मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय ■ इच्छुकांच्या अपेक्षेवर पाणी फेरलं

मुंबई : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वी कॅबिनेट बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत ८ मोठे निर्णय घेण्यात आले असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावादेखील घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील नगरपंचायत व नगरपालिकांमधील नगराध्यक्षांचा कालावधी आता २.५ ऐवजी ५ वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे, पुढील काही दिवसांत नगराध्यक्षपदासाठी सोडत निघणार होती, त्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार नगराध्यक्षपदाची स्वप्ने रंगवत होती, त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरलं गेलं आहे.**



महाराष्ट्रात २२८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच-अडीच वर्षांचे असे दोन अध्यक्ष निवडण्याचे निश्चित करून पहिल्या टप्प्याच्या नगराध्यक्षपदासाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे, आता दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपली असता नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरुन ५ वर्षांवर करण्यात आला आहे. त्यामुळे, नगराध्यक्षपदाची स्वप्ने पाहणाऱ्या नगरसेवकांची घोर निराशा झाली आहे.

राज्यात एकीकडे २ वर्षांपासून बहुतांश नगरपालिका, नगरपंचायत आणि महापालिकांमध्ये प्रशासन राज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न झाल्यामुळे येथील उर्वरीत पान ३ वर

# जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल

## ■ ३८ अधिकाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या ■ आर्थिक गुन्हे शाखेला नवे निरीक्षक

नगर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहे. १६ पोलीस निरीक्षकांसह १२ सहायक पोलीस निरीक्षक आणि १० पोलीस उपनिरीक्षक, असे एकूण ३८ अधिकाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहे. बदल्यांचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी नुकतेच जारी केले आहे.**



नव्या बदल्यांमध्ये आर्थिक गुन्हे शाखेला नवे पोलीस निरीक्षक मिळाले असून या शाखेचा पदभार आता नितीन चव्हाण यांच्याकडे सोपविला जाणार आहे. तर सायबर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेन्द्राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक समाधान चंद्रभान नागरे यांची बदली नगर नियंत्रण कक्षातून शेवगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक दिगंबर हरी भदाणे यांची बदली शेवगाव पोलीस ठाण्यातून घारगाव (संगमनेर) पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष बाबूराव खेडकर यांची बदली जिल्हा विशेष शाखेत करण्यात आली आहे. संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भगवान हरिभाऊ मथुरे यांची बदली कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नगर जिल्हा विशेष शाखेत कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक बापूसाहेब शांताराम महाजन संगमनेर शहर पोलीस ठाण्याचे नवे पोलीस निरीक्षक असतील. भरोसा सेलचे पोलीस निरीक्षक दौलत शिवराम जाधव जिल्हा विशेष शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून काम पाहतील. कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप बाळासाहेब देशमुख यांची बदली शिर्डीच्या वाहतूक नियंत्रण शाखेत करण्यात उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## पासवर्ड असे ठेवा सेव्ह!

तुमचे सगळे पासवर्ड सुरक्षितरित्या सेव्ह करण्यासाठी काही ॲप्स मदत करतात, त्याविषयी...



- ब्लर : हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करण्याबरोबरच पासवर्ड तयार करण्यासाठी आणि ते ऑटो-फील करण्यासाठी सुद्धा वापरता येऊ शकतं. लॉग इन आणि पासवर्ड यामध्ये लॉग इन इन्फॉर्मेशन ॲड करता येते. ॲड केलेली माहिती नंतर कॉपी, एडीट आणि डिलीट करता येते. यामध्ये स्वतंत्र प्रायव्हेट ब्राऊजर उपलब्ध आहे जो वापरून एखाद्या वेबसाइटवर आपलं लॉग इन आणि पासवर्ड ऑटोफिल करता येतात. हे ॲप्लिकेशन आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध आहे.
- स्टिकी पासवर्ड : स्टिकी पासवर्ड ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्याची सुविधा देतं. हे ॲप्लिकेशन विंडोजसाठी असलेले क्रोम, क्रोमियम, फायरफॉक्स, थंडरबर्ड, इंटरनेट एक्सप्लोरर या ब्राऊजरवर तर अँड्रॉइडसाठी फायरफॉक्स, डॉल्फीन आणि यूसीवेब या ब्राऊजरवर आणि आयओएसवर सफारी या ब्राऊजरवर वापरता येतं. मॅकवर हे सफारी बरोबरच क्रोमवर सुद्धा वापरता येतं.
- डॅशलॅन : आयओएस, अँड्रॉइड, विंडोज आणि मॅक यावर उपलब्ध असणारं हे ॲप्लिकेशन पासवर्ड सेव्ह करून ते ऑटोफिल करण्यास मदत करतं. जर आपण वापरात असलेली एखादी साइट सेक्युअर नसेल तर तसं सूचितही करतं. यामुळे संभाव्य धोका टळू शकतो. या ॲप्लिकेशनमध्ये अन्य ॲप्लिकेशन जसे की वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास यात सेव्ह केलेली माहिती इम्पोर्ट करण्याची सुविधा आहे. यात आपण सेव्ह केलेली माहिती फक्त आपल्या डिव्हाइसवर ठेवायचा पर्यायसुद्धा दिला गेला आहे.

### ही काळजी घ्या...

- ठरावीक कालावधीनंतर पासवर्ड बदला.
- पुन्हा तोच पासवर्ड ठेवणं टाळा.
- पासवर्डमध्ये नंबर, स्पेशल कॅरॅक्टर, कॅपिटल आणि स्मॉल लेटर्स ठेवून तो अधिक सुरक्षित करावा.
- अन्य कोणाशीही पासवर्ड शेअर करू नये.
- पासवर्डमध्ये आपली वैयक्तिक माहिती जसं की नाव, जन्मतारीख याचा वापर करणं टाळा.
- सगळ्या ठिकाणी एकच पासवर्ड वापरू नये.
- जर पासवर्ड कुठे स्टोअर केले असतील तर ते अन्य कोणाला सहज मिळणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- आठ ते बारा कॅरेक्टर्सचा पासवर्ड हा अधिक सुरक्षित मानला जातो.

- पासवर्ड बॉस : पासवर्ड सेव्ह करून ऑटोफिलची सुविधा देणारं हे ॲप्लिकेशन विंडोज, अँड्रॉइड, आयओएस यावरच उपलब्ध आहे. मॅक आणि लिन्युक्स यावर हे ॲप्लिकेशन उपलब्ध नाही. वन पासवर्ड, रोबोफोर्म आणि लास्टपास हे डॅशलॅन बरोबरच क्रोम, इंटरनेट एक्सप्लोरर, फायरफॉक्स, ओपेरा आणि एज या ब्राऊजर्समधून सुद्धा लॉगिन माहिती यात इम्पोर्ट करता येते.

## ८४ टक्के लोक जोडीदाराशी शेअर करतात पासवर्ड!

आपण कितीही प्रायव्हसीच्या गोष्टी करत असलो तरी ८४ टक्के भारतीय त्यांचे पासवर्ड त्यांच्या जोडीदाराबरोबर शेअर करत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स, सोशल मीडिया हे सगळं सध्याच्या जीवनशैलीचा एक भाग आहे. दोघांच्या नात्यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत असून जोडीदाराबरोबर पासवर्ड शेअर करण्यात काहीच चुकीचं नसल्याचं अनेकांना वाटतयं. मॅक्फी संस्थेच्या एका अहवालातून ही बाब समोर आली आहे. ६०० लोकांचा सर्व्हे करण्यात आला. त्यानुसार, तंत्रज्ञानाचा वापर नात्याचा एक भाग असल्याचं मत ७७ टक्के लोकांनी व्यक्त केलं. नात्यात प्रायव्हसी महत्त्वाची असते, असं ८९ टक्के भारतीयांनी सांगितलं. ६७ टक्के तरुण मुला- मुलींना वाटतं की त्यांच्या जोडीदाराचं त्यांच्यापेक्षा इंटरनेटवरच जास्त लक्ष असतं. तर, ८१ टक्के भारतीयांच्या मते, त्यांचे मित्र व कुटुंबातील सदस्य त्यांच्या सोबत असतानाही मोबाइलमध्येच जास्त रमलेले असतात.

# ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटना



देशात अलीकडच्या काही वर्षांत अनेक लोकांनी डिजिटल आर्थिक व्यवहार सुरू केल्याचे चित्र आहे. याचाच गैरफायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम वाढल्याचे या सर्वेक्षण अहवालात म्हटले आहे. एफआयएस या नवनव्या तंत्रज्ञानावर आधारित आर्थिक सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपनीच्या वतीने हा अहवाल नुकताच तयार करण्यात आला आहे. भारतीयांनी डिजिटल तंत्रज्ञानावर स्वार होऊन कॅशलेस आर्थिक व्यवहारांत वेग धरला असला, तरीही डिजिटल व्यवहार करताना कुठली काळजी घ्यावी, काय करावे आणि काय करू नये, स्वतःची खासगी माहिती गुप्त ठेवून फिशिंग मेलपासून स्वतः चे आर्थिक रक्षण कसे करावे, याबाबत मात्र त्यांच्यात पुरेशी जागृती झालेली नाही, असे या अहवालात म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर बँकांची जबाबदारी वाढली असून, डिजिटल व्यवहारांसाठी त्यांनी ग्राहकांना अधिक सुरक्षित तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यायला हवे; तसेच ग्राहकांना हे व्यवहार सुरक्षितपणे कसे करावेत, याचे प्रशिक्षणही द्यावे, अशी मागणी आता जोरकसपणे पुढे येताना दिसून येत आहे.



**एकीकडे देशातील डिजिटल आर्थिक व्यवहारांत वाढ होत चाललेली असतानाच दुसरीकडे ऑनलाइन आर्थिक गुन्हेगारीदेखील वेगाने वाढत असल्याचे धक्कादायक वास्तव एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. डिजिटल व्यवहारांतील अनेक उणीवांचा आणि त्रुटींचा फायदा घेऊन आर्थिक सायबर क्राइम तसेच लोकांची ऑनलाइन ओळख चोरून त्यांच्या नावाने आर्थिक गैरव्यवहार करण्याचे प्रकार (आयडेंटीटी थेप्ट) देशात वाढीला लागल्याचे दिसून आले आहे. चालू वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या सर्वेक्षणात म्हटले आहे.**

### अहवालातील महत्त्वपूर्ण निरीक्षणे

- २०२३ या वर्षात आर्थिक फसवणुकीचे बळी ठरलेल्या लोकांची संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत दुप्पट झाल्याचे या अहवालात म्हटले आहे.
- आर्थिक फसवणुकीचा फटका बसणाऱ्या लोकांपैकी ९६ टक्के लोकांना मोबाइल ॲपमधून बसला फटका.
- आर्थिक फसवणुकीचे सर्वाधिक बळी २७ ते ३७ या वयोगटातील.
- मोबाइल ॲपचा वाढता वापर, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन आर्थिक फसवणूक यात थेट संबंध.
- ऑनलाइन आर्थिक व्यवहारांच्याबाबत देशातील लोकांची जागृती गरजेची. बँकांचे ४१ टक्के व्यवहार आता होतात ॲपवरून.
- मोबाइल पेमेंट आता कॅश आणि कार्ड पेमेंटपेक्षाही वाढले.

## कॅशलेस होताना...

**रोकडविरहित व्यवहारांची सोय होण्याऐवजी त्यामुळे ताण वाढतो आहे. कारण यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागत आहे. लोकांनी अधिकाधिक व्यवहार कॅशलेस करावेत यासाठी सरकारकडून काही सवलतीही देण्यात आल्या आहेत. कॅशलेस व्यवहारात संबंधित व्यक्तीने दिलेली ओळख चोरीला जाण्याची भीती आहे. मग कॅशलेसचे फायदे-तोटे नेमके कोणते आहेत, ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न...**

### कॅशलेसचे फायदे

- सुविधा : आर्थिक व्यवहार करण्यातील सुलभता हा कॅशलेस होण्यासाठी उद्युक्त करणारा सर्वात मोठा घटक आहे. प्रत्येक व्यवहारासाठी तुम्हाला रोकड घेऊन जाण्याची गरज नाही की एटीएममधून पैसे काढण्यासाठी रांगेत उभे राहण्याचीही गरज नाही. प्रवासात कॅशलेस व्यवहार खूप उपयुक्त ठरतात. तुम्हाला कुठेही व कधीही यामुळे व्यवहार पूर्ण करणे सोपे जाते.




- सवलती : डिजटल प्रणालीने इंधन खरेदी केल्यास त्यावर ०.७५ टक्के सूट, रेल्वे तिकिटे, महामार्गाचा टोल, विमा खरेदी या सर्वांवर देण्यात येणारी सूट हादेखील त्याचाच एक भाग आहे. मोबाइल वॉलेट कंपन्यांनी दिलेल्या सवलती यांची यात भर पडली आहे.
- खर्चाचा मागोवा शक्य : सर्व व्यवहार नोंदवले जात असल्यामुळे खर्चाचा मागोवा घेणे लोकांना खूप सोपे जाणार आहे. याचा उपयोग आयकर विवरणपत्र भरताना तसेच आयकरविषयक चौकशीच्या वेळी होणार आहे. त्याचप्रमाणे महिन्याच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतानाही याचा उपयोग लोकांना होणार आहे.
- अंदाजपत्रकाला शिस्त : तुमच्या घरच्या मासिक अंदाजपत्रकाला शिस्त लागणार आहे. मोबाइल ॲप व टूल्स यामुळे लोकांना त्यांच्या खर्चाची पद्धत पाहणे शक्य होते, ज्यामुळे मागील काही वर्षांतील खर्चाचा आढावाही घेता येतो. खर्च नियंत्रित झाल्यास गुंतवणूक वाढवणे शक्य होते. अनावश्यक खर्चाला आळा घालणेही यामुळे शक्य होते.
- कमी जोखीम : चोरी झाल्यास तुम्हाला तुमचे कार्ड ब्लॉक करता येते किंवा मोबाइल वॉलेट ब्लॉक करता येते. परंतु रोकड चोरीला गेल्यास ती परत मिळणे दुरापास्त असते. याचा फायदा प्रवासादरम्यान होतो.
- छोटे फायदे : जेवढे बिल झाले असले तेवढीच रक्कम तुम्हाला (सुट्या पैशांत बिल झाले असले तरी) भरता येते. त्यामुळे दुकानदारांची सुटे पैसे देण्यातून सुटका होते.


### कॅशलेसचे तोटे

- ओळखचोरीची भीती : कॅशलेस व्यवहारांत ओळखचोरीची सर्वाधिक भीती असते. आपण कॅशलेस व्यवहारांना सरावलेले नसल्यामुळे फिशिंग मेल्सच्या जाळ्यात शिक्षित लोकही अलगद सापडतात. गैरप्रकार झाल्यास त्यावर कारवाई करण्यासाठी प्रभावी यंत्रणा आपल्याकडे नाही.



एखाद्या गरीब रिक्षावाल्याचा आधार क्रमांकच चोरीला गेला तर तो काय करणार? अशावेळी तपास यंत्रणा तोकडी असल्याचा फटका कॅशलेस व्यवहारांना बसू शकतो. याशिवाय बँकांच्या डेटाबेसमधून माहिती चोरीला गेल्यास त्याचाही फटका बसू शकतो.

- फोन हरवणे : कॅशलेस व्यवहारांसाठी केवळ मोबाइल फोनवरच अवलंबून राहणार असाल तर या फोनची चोरी झाल्यास तुम्हाला त्याचा मोठा फटका बसू शकतो. तुम्ही परदेशात असाल किंवा प्रवास करत असला आणि अशी घटना घडली तर त्यामुळे तुमची पंचाईत होऊ शकते. शिवाय तुम्हाला तुमचा फोन सतत चार्ज्ड ठेवावा लागतो. फोनची बॅटरी उतरल्यास तुम्हाला कॅशलेस व्यवहार करता येत नाहीत.
- तंत्रज्ञानाला न सरावलेल्यांसाठी अवघड : देशात केवळ ३४.८ टक्के इंटरनेटचा प्रसार झाला आहे. एकूण मोबाइल वापरकर्त्यांपैकी केवळ २६.३ टक्के लोकांकडे स्मार्टफोन आहेत. डिजिटल होण्यामध्ये मानसिकता न बदलणे ही मोठी समस्या आहे. याचा त्रास ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक होतो.
- अतिखर्च : प्रत्यक्ष रोकड खर्च करावी लागत नसल्याने खर्चात वाढ होऊ शकते. रोकड प्रत्यक्ष बाळगून खर्च करावी लागल्यास हातातून पैसे जात आहेत या कल्पनेनेच खर्चावर नियंत्रण येते. मात्र कार्डांनी किंवा मोबाइल वॉलेटने पैसे द्यावे लागल्यास जवळची रोकड जात नसल्याने अधिक खर्चाची प्रवृत्ती वाढीस लागण्याची भीती असते.




# इंटरनेट बँकिंगची सुविधा


**घरोघरी आज इंटरनेटचा वापर वाढला आहे. त्यामुळे जवळपास सर्वच बँकांनी इंटरनेटद्वारे बँकिंगची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नेटबँकिंगच्या सुविधेचा वापर करताना आपल्याकडून नजर चुकीने काही त्रुटी राहतात आणि सायबर चोरांकडून हॅकिंगसारखे प्रकार घडून आपणास नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. त्यामुळे आपण नेटबँकिंग प्रणाली समजून घेऊ. आज सर्वच बँका आपापल्या नेटबँकिंग प्रणालीमध्ये ग्राहकांची व व्यवहाराची सुरक्षा व गोपनीयता राखण्यास प्राधान्य देतात. सर्वसाधारणपणे या सुविधेचा वापर करताना बँक तुमचे दोन गोपनीय पासवर्ड विचारते, म्हणजेच जोवर आपण हे दोन्ही पासवर्ड देत नाही तोवर व्यवहार पूर्ण होत नाहीच. त्याचप्रमाणे काही बँका अजून सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने तुमच्या मोबाइलवर पासवर्ड पाठवून व्यवहार तुम्हीच करत आहात ना, याची खात्री करून घेते. सर्वात पहिला व महत्त्वाचा नियम म्हणजे, कुठलीही बँक व बँकेचा प्रतिनिधी फोन, ई-मेल व वैयक्तिकरित्या तुम्हास खात्याबद्दल व पासवर्डबद्दल विचारणा करत नाही. सर्वसाधारणपणे बरेचसे ग्राहक या जाळ्यात फसतात.**

### सुरक्षिततेसाठी काय कराल?

- बँकखात्याची माहिती कुणालाही अगदी बँकेलाही फोन, ई- मेल वा वैयक्तिकरित्या देऊ नका.
- पासवर्ड नियमितपणे दर १५ दिवसांनी बदलत राहा. पासवर्ड अतिशय कठीण पातळीचा ठेवा त्यात, शब्द अंक, विशेष चिन्हांचा वापर करा. बँकेची एसएमएस सुविधा सुरू ठेवा.
- बँकेचे व्यवहार सायबर कॅफेमधून न करता घरातील कम्प्युटरवर करा. बँकेचे संकेतस्थळ नीट पाहून टाइप करा. एचटीटीपीएस दिसत नसल्यास व्यवहार करू नका.

### प्रतिबंधक उपाय...

- सायबर विश्वातील बहुतेक आर्थिक गुन्हे पासवर्ड व लॉग इन आयडी चोरून घडतात. बऱ्याचशा एक्स्पर्ट कम्प्युटर वापरणाऱ्यांनासुद्धा त्यांच्या नकळत पासवर्ड व लॉग इन आयडी चोरला जाऊ शकतो याची नीटशी कल्पना नसते. बँक अशा प्रकारे घडलेल्या गुन्ह्यातील आर्थिक नुकसानीची जबाबदारी घेत नाहीत. काही बँका तुम्हाला दर दोन आठवड्यांनी तुमचा पासवर्ड बदलण्यास भाग पाडतात. हे सायबर गुन्हे टाळण्यासाठी हे महत्त्वाचे आहे.




- आर्थिक व्यवहार करण्यासाठी संस्था अथवा बँका त्यांच्या अधिकृत संकेतस्थळाचा इंटरनेटवरचा पत्ता (यूआरएल) तुम्हाला पाठवते. तो पत्ता जर एचटीटीपी या शब्दाने चालू होत नसेल तर सावधान. एचटीटीपी या शब्दाने चालू होणारे इंटरनेटवरचे सर्व यूआरएल सुरक्षित नसतात. एचटीटीपी पत्ता असणाऱ्या संकेतस्थळावर तुम्ही टाइप केलेला सर्व मजकूर इंटरनेटला जोडलेली कुठलीही व्यक्ती थोड्या प्रयत्नांती वाचू शकते व त्या माहितीचा गैरवापर करू शकते.
- कम्प्युटर सुरक्षेच्यादृष्टीने कुठलीही महत्त्वाची माहिती चॅट करताना टाइप करू नका. उदा : क्रेडिट कार्ड नंबर, पॅनकार्ड नंबर, तुमची जन्मतारीख आदी. तुम्ही जर चॅट करताना मायक्रोफोन व वेब कॅमेरा वापरत असाल तर त्यामार्फत तुम्हाला नकळत तुमच्या हालचाली, फोनवरची बातचित, तुम्ही की-बोर्ड वरची कुठली बटने दाबलीत हे सायबर चोर प्रयत्नांती समजू शकतो. त्या माहितीचा उपयोग करून तुमचा पासवर्ड पण चोरला जाऊ शकतो. यावर सोपा उपाय म्हणून मायक्रोफोन व वेब कॅमेरा काम झाल्यावर बंद करा किंवा झाकून ठेवा.
- सध्या स्पायवेयरचा प्रसार प्रचंड वाढलाय. काही ई-मेल उघडल्यावर लगेचच तुमच्या कम्प्युटरमध्ये स्पायवेयर शिरू शकते. तसेच, काही गेम्स व प्रोग्रॅम्स डाउनलोड करताना पण स्पाय वेयर शिरू शकते. अशा विविध प्रकारांनी स्पाय वेअर तुमच्या नकळत तुमच्या कम्प्युटरमध्ये शिरतात आणि तुम्ही कम्प्युटरवर काय करता याची पूर्ण खबर ठेवतात. तुमची खासगी माहिती, पासवर्ड, कोणते प्रोग्रॅम वापरले, कुठल्या वेबसाइटना भेटी दिल्या ही माहिती सायबरचोरांच्या हाती लागू शकते. दोन किंवा तीन दिवसांनी कम्प्युटरच्या वापरामुळे जमा झालेली तात्पुरती डाउनलोडेड माहिती व जुनी वेब पेजेस कायमस्वरूपी काढून टाकत चला. कम्प्युटर आणि इंटरनेटचे फायदे पाहता कम्प्युटर न वापरणे हा पर्याय नसून काळजी घेतली तर या सायबर चोरांवर मात करणे अजिबात अवघड नाही.

### कसे कराल पैसे ट्रान्सफर?

#### नेटबँकिंगच्या मर्यादा

नेटबँकिंग हा बँकेकडून ग्राहकाला दिलेला आर्थिक व्यवहाराचा कॅशलेस पर्याय आहे. यामुळे कसलाही व्यवहार करण्यासाठी बँकेत जाण्याची गरज नाही. एका दिवस-ात कोणत्याही बँकेच्या ग्राहकाला एक रुपयापासून ते १० लाखापर्यंत पैसे पाठवता येऊ शकतात. यासाठी कोणताही अधिकचा कर लागत नाही. सध्या नेटबँकिंगचा वापर जवळपास २०० टक्क्यांनी वाढल्याचं बोललं जात आहे. नेट बँकिंग प्रक्रिया सर्व बँकांची थोड्या फार फरकाने सारखीच आहे.



कस्टमर आय.डी. आणि आयपिन मिळाल्यानंतर संबंधित बँकेच्या अधिकृत वेबपेजवर जावे. तिथे पहिल्यांदा कस्टमर आयडी टाकण्याचा पर्याय येईल. कस्टमर आयडी टाकल्यानंतर आयपिन टाकण्याचा पर्याय येईल. लॉग इन केल्यानंतर पहिल्यांदा खात्याचा तपशील दाखवला जाईल. बाजूलाच फंड ट्रान्सफर हा पर्याय दिलेला आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांच्या बँकेचा आयएफएससी कोड, बँक खाते नंबर आवश्यक आहे. पैसे ट्रान्सफर करण्यासाठी अगोदर बेनिफिशिअरी क्रमांक म्हणजे ज्यांना पैसे पाठवायचे आहेत, त्यांचा तपशील तयार करणं गरजेचं आहे. फंड ट्रान्सफरमध्ये गेल्यानंतर बाजूलाच रिक्वेस्ट हा पर्याय आहे. त्यावर क्लिक केल्यानंतर ॲड बेनिफिशिअरी हा पर्याय दिसेल. त्यामध्ये ज्यांना पैसे पाठवायचे त्यांचा आयएफएससी कोड, खाते क्रमांक ही माहिती दिल्यानंतर पुढील स्टेपमध्ये जावे. खाते क्रमांक, आयएफएससी कोड टाकून पुढे गेल्यानंतर कन्फर्म करण्यापूर्वी तुमच्या रजिस्टर केलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. तो ओटीपी टाकून बेनिफिशिअरी तयार करावं. बेनिफिशिअरी तयार केल्यानंतर सरासरी ३० मिनिटांनंतर तुम्ही पैसे पाठवू शकता. ३० मिनिटांनंतर इतर बँकांना पैसे पाठवता येतील. त्याच बँकेच्या ग्राहकाला पैसे पाठवायचे असतील तर ट्रान्सफर विदिन बँक हा पर्याय निवडावा किंवा इतर बँकेच्या ग्राहकाला पैसे ट्रान्सफर करायचे असतील तर ट्रान्सफर टू ऑदर बँक हा पर्याय निवडावा. त्याच बँकेच्या ग्राहकालाच पैसे पाठवायचे असतील तर तीन स्टेपमध्ये पैसे पाठवता येतात. पहिल्या स्टेपमध्ये तुम्हाला सेव्हिंग किंवा करंट अकाऊंटमधून पैसे पाठवायचे आहेत, तो पर्याय निवडावा. त्यानंतर ट्रान्सफर नाऊ हा पर्याय निवडून तुम्ही ॲड केलेल्या बेनिफिशिअरीचा क्रमांक निवडावा. जेवढे पैसे पाठवायचे आहेत ती रक्कम टाकावी. त्यानंतर कन्फर्म करावं. कन्फर्म केल्यानंतर तुम्हाला खात्याशी कनेक्टेड मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. ओटीपी टाकल्यानंतर काही क्षणात पैसे ट्रान्सफर होतील.

### या चुका करू नका...

कोणत्याही व्यक्तीसोबत आपला अकाउंट पासवर्ड शेअर करू नका. कोणत्याही अज्ञात लिंक किंवा अटॅचमेंटला ओपन करू नका. ऑनलाइन बँकिंगचा वापर केल्यानंतर त्याचे लॉगइन तसेच ठेवू नका. नेहमी लॉगआउट जरूर करा. आपली पर्सनल यूएसबी किंवा हार्ड डिस्कचा वापर कोणत्याही अन्य दुसऱ्या लॅपटॉप किंवा कम्प्युटरवरून करू नका. सोशल मीडियावर कधीही आपली जन्मतारीख, पत्ता, फोन नंबर यासारखी माहिती उघड करू नका. यावरून ऑनलाइन फ्रॉड होऊ शकतो.

## शॉर्ट न्यूज

### नवदाम्पत्याची गळफास घेत आत्महत्या

**संगमनेर :** चार महिन्यांपूर्वी लग्न झालेल्या नवदाम्पत्याने आत्महत्या केल्याची घटना साकूर येथे घडली. रात्री आठच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. साकूर येथील वैभव दत्तात्रय आमले (वय २४) आणि स्नेहा वैभव आमले (वय २२) या दोघांचा चार महिन्यांपूर्वीच विवाह झाला होता. ते पुणे जिल्ह्यातील चाकण येथे काम करत होते. चार दिवसांपूर्वी दोघेही गावी आले. ते देवदर्शनाला जातो, असे सांगून गावात आले होते. रात्री आठ वाजेपूर्वी साकूर येथील बिरोबा माळ येथील वन विभागाच्या हद्दीत झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचे मृतदेह मिळून आले.

### वृक्षारोपण करून घरावर तिरंगा फडकवला

**श्रीरामपूर :** ''हर घर तिरंगा अभियान'' अंतर्गत श्रीरामपूरच्या सर्व नागरिकांनी एक पेड माँ के नाम अशा पद्धतीने वृक्षारोपण करून आपापल्या घरावर १५ ऑगस्टला तिरंगा फडकवावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष दिपक अण्णा पटारे यांनी केले. भारतीय जनता पार्टी श्रीरामपूर तालुकाध्यक्ष दीपक पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्यांक शहराध्यक्ष आसिफ पोपटिया यांनी पशुसंवर्धन उपक्रम बेलापूर येथील व्यास आश्रम गोविंद गो-अनुसंधान गौशाला येथे एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत विठ्ठल आश्रम येथे वृक्षारोपण करण्यात आले.

### अत्याधुनिक कोल्ड स्टोरेजसाठी ११ कोटी

**राहाता :** राहाता व शिर्डी परिसरात डाळींब व फुलांचे चांगले मार्केट आहे. तेव्हा या परिसरातील शेतकऱ्यांचा शेतमाल सुरक्षित राहावा, यासाठी राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीत अत्याधुनिक कोल्ड स्टोरेजसाठी ११ कोटी रूपये मंजूर करत अशी घोषणा राज्याचे पणन अल्पसंख्याक विकासमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली. साकुरी- राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य आवारातील विविध विकासकामांचे भूमिपूजन पणन, अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

### विनयभंग करणाऱ्यास एक वर्षाची शिक्षा

**नगर :** तालुक्यातील एका गावातील महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीस एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा, तसेच ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी बी.बी. शेळके यांनी ठोठावली. नगर तालुक्यातील एका गावात महिला एकटीच घरी असताना आरोपीने तिच्या बाथरूममध्ये घुसून तिचा विनयभंग केला. संबंधित महिलेने नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलीस नाईक ए. एच.अबनावे यांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

### निळवंडेचे उच्चस्तरीय कालव्यांतून पाणी सोडा

**अकोले :** निळवंडे धरणातून ओव्हरफ्लो होऊन जाणारे पाणी उच्चस्तरीय कालव्यांतून सोडण्यात यावे, अशी मागणी अकोले भाजपच्यावतीने तहसीलदारांकडे निवेदनातून करण्यात आली. निळवंडे धरणातून ओव्हरफ्लो होऊन वाहून जाणारे पाणी हे खालील जिरायती भागासाठी उजव्या व डाव्या कालव्यांतून सोडण्यात येणार आहे, त्याचा फायदा जसा जिरायती भागातील शेतकऱ्यांना होणार आहे. तसा अकोले तालुक्यातील निळवंडे धरणाच्या वरच्या भागातील दुष्काळी भागाला मिळण्यासाठी उच्चस्तरीय कालव्यांतून पाणी सोडल्यास त्याचा फायदा संबंधित भागातील सर्व शेतकऱ्यांना मिळेल.

# शेतकऱ्याचा मुलगा विक्रांत देशमुख पोलीस अधीक्षकपदी!

**■ कर्डे गावचा सुपुत्र सांभाळणार पुणे महामार्गाची सुरक्षा**
**■ कामाशी प्रामाणिक असणारा अधिकारी म्हणून पोलीस दलात प्रतिमा**

शिरूर : सतीश डोंगरे

**पुणे जिल्ह्यातील प्रमुख महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी प्रभावी उपाय योजना राबविणे, महामार्गावरील ब्लॅक स्पॉटवर कायमस्वरुपी उपाययोजना करुन अपघातास अटकाव करणे, वाहनचालकांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करणे त्याबरोबरच महामार्गावरील गावांमध्ये रस्ते सुरक्षिततेबाबत कार्यक्रम राबविणे, यासारखे उपक्रम आगामी काळात राबविण्याचा विचार आहे... हे उद्गार आहेत चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर पोलीस अधीक्षकपदाला गवसणी घालणाऱ्या विक्रांत विश्वास देशमुख यांचे.**



कुटुंबात पोलीस दलाचा कोणताही वारसा नसताना कर्डे गावचे सुपुत्र विक्रांत विश्वास देशमुख यांनी पोलीस अधीक्षक पदापर्यंत मजल मारली आहे. पुण्याच्या पोलीस उपायुक्त पदावरुन त्यांची नुकतीच पुणे महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक पदी बदली झाली आहे. कामाशी प्रामाणिक असणारा अधिकारी अशी पोलीस दलात त्यांनी आपली छाप उमटवली आहे. चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर उच्च पद मिळविणाऱ्या विक्रांत देशमुख यांच्या यशाने कर्डे गावचे नाव उंचावले आहे.

विक्रांत देशमुख यांचे शिक्षण पुण्यात पिंपरी-चिंचवड येथे झाले. शिक्षणात तसे ते लहानपणापासूनच हुशार. शेतकरी कुटुंब, वडील कामगार. मुलाने शिकून मोठा अधिकारी व्हावे अशी वडिलांची तीव्र इच्छा आणि ती पूर्ण करण्यासाठी विक्रांत यांनी जिद्दीने अभ्यास केला. कृषी पदविका मिळविल्यानंतर श्री. देशमुख हे २०१० मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा पास झाले आणि नाशिक येथील पोलीस प्रशिक्षणानंतर त्यांची अप्पर पोलीस अधिक्षक म्हणून अकोला येथे नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी पोलीस उपायुक्त म्हणून पालघर, जालना, पुणे येथे आपल्या कामाने ठसा उमटविला. गेल्या १४ वर्षांपासून ते पोलीस दलात कार्यरत आहेत.


> **कर्डे गांव माझे प्रेरणास्थान !**
>
> **कर्डे गावाशी आजही माझी घट्ट नाळ जुळलेली आहे. गावाबद्दल मला सार्थ अभिमान आहे. कर्डे गांव माझे प्रेरणास्थान आहे. वेळ मिळेल तेंव्हा मी विशेषतः गावच्या ग्रामदैवतच्या यात्रेला कुटुंबियांसह आवर्जून हजेरी लावतो, गावातील ज्येष्ठांचे आशिर्वाद घेतो. पालकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत घेऊन अभ्यास केला पाहिजे. त्यातून नक्कीच यशाचे शिखर गाठता येते.**
>
> **विक्रांत विश्वास देशमुख**
> **पोलीस अधीक्षक, महामार्ग रस्ता सुरक्षा विभाग पुणे**

सन २०२० मध्ये मुंबई-अहमदाबाद महामार्गावर हॉटेलमध्ये रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत १ लाख १० हजार लुटणाऱ्या दरोडेखोरांना पालघर पोलीसांनी जेरबंद केले होते. विशेष म्हणजे पोलीस दलाने अवघ्या चार तासांतच आरोपींच्या मुसक्या आवळल्या होत्या, यामध्ये अप्पर पोलीस अधिक्षक म्हणून विक्रांत देशमुख यांनी महत्वपूर्ण भुमिका बजावली होती.त्याचवेळी पालघर जिल्ह्यात तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने सर्वसामान्यांचे जीवन अस्तव्यस्त करून टाकले असताना अनेक सखल भागात साचलेल्या पाण्यातून, प्रवाहातून विक्रांत देशमुख आणि त्यांच्या पोलीस सहकाऱ्यांनी २२ नागरिकांचे प्राण वाचविण्याची कामगिरी करून संवेदनशीलतेचे दर्शन घडविले होते. जालना आणि अलिकडच्या काळात पुण्यातही त्यांनी अशीच चमकदार कामगिरी करत वरिष्ठांकडून पाठीवर कौतुकाची थाप मिळविली आहे.

विक्रांत देशमुख यांची महामार्ग सुरक्षा विभागाचे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या कर्डे गावातील ग्रामस्थांची छाती अभिमानाने फुलून आली. सोशल मीडियावर त्यांच्या शुभेच्छांचे संदेश झळकले. ग्रामस्थांनी बसस्थानकावर मोठा फ्लेक्स लावून अभिनंदन केले.

## वाचकांच्या लेखणीतून

### चटका लावणारी एक्झिट !



आपल्या सहज सुंदर अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून चित्रपट, नाटक, मालिका आदी माध्यमांद्वारे रसिक मनावर अधिराज्यच नव्हे तर प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण करणारे आपला माणूस म्हणून आपलेसे वाटणारे विजयजी कदम यांच जाण चटका लावणार, वेदनादायी. मराठी कला विश्वाच नुकसान करणार.

टूर टूर, सही रे सही, इरसाल कार्टी, गंमत जंमत, पप्पा सांगा कुणाचे, तेरे मेरे सपने, दे दणादण, हळद रुसली.. नाव तरी किती सांगायची, मात्र अशा अनेक विविधांगी कलाकृतीतून त्यांनी केलेल्या दमदार भूमिका जशाच्या तशाच नजरेसमोर येतात आणि हृदयात रुतून जातात अभिनेत्यासह. अभिनेते विजयजी कदम यांच्या अभिनयातून सजलेली, साकारलेली एक एक कलाकृती म्हणजे कला विश्वातील टपोरा मोतीच याचा विसर रसिक मनाला कधीही पडणार नाही.

वैशिष्ट्यपूर्ण संवादफेक, मुद्राअभिनय, अचूक टाइमिंग, भूमिकेतील लहान-सहान काना कोपरे शोधत ते लक्षवेधी करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होतं. विनोदी भूमिकांसह गंभीर भूमिका नाही ते यशोशिखरावर घेऊन जात अशी जबरदस्त ताकद असलेला कलावंत. व्यक्तिरेखेचा स्वभाव स्वतःमध्ये भिनवायची जबरदस्त शक्ती असणारा हा कलाकार. त्यांच्या खुमखुमीचा विसर तर रसिक मनाला कधीच विसरता येणार नाही. माणूस आणि माणुसकी जपणाऱ्या आपल्या माणसास अभिनेते विजय कदम यांना भावपूर्ण आदरांजली.

**■ विश्वनाथ पंडित,**
**ठाणे**

# आम्हाला मते द्या, नसता खात्यातून पैसा परत काढून घेणार!

## लाडकी बहीण योजनेच्या पैशांवरुन आमदार रवी राणा यांचे धक्कादाय वक्तव्य

**अमरावती : प्रतिनिधी**



**आमचे सरकार आल्यावर लाडकी बहीण योजनेचे दीड हजार रुपये आम्ही दुप्पट म्हणजे ३००० रुपये करू. मात्र त्यासाठी मला तुमचा आशीर्वाद हवा आहे. मात्र, ज्यांनी मला आशीर्वाद दिला नाही, अशांच्या खात्यातून दीड हजार रुपये वापस घेऊ, असे धक्कादायक वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. अमरावतीमध्ये आयोजित मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात ते बोलत होते. ज्यांचे खाल्ले त्यांचे जागलेच पाहिजे, सरकार देत राहते मात्र, सरकारलाही आशीर्वाद दिला पाहिजे, असे मत रवी राणा यांनी व्यक्त केले आहे.**

रवी राणा यांच्या या वक्त्यामुळे राज्यात आता चांगलीच चर्चा रंगली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली. तेव्हापासूनच या योजनेची चर्चा राज्यभर सुरू आहे. मात्र, आता याच योजनेवरून वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रवी राणा यांच्या वक्तव्यावर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी जोरदार पलटवार केला आहे. महाराष्ट्रातील बहिणींना दिले जाणारे पैसे हे तुमच्या घरचे आहेत का? असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. हा राज्य सरकारचा पैसा आहे, आणि केवळ दीड हजार रुपयात महाराष्ट्रातील महिला भगिनी त्यांचे मत विकतील का? असा सवालही त्यांनी उपस्थित केलाय.

**विजय वडेट्टीवारांचा पलटवार**

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सरकारी पैशातून आहे. निवडणुकीच्या तोंडावर मते मिळविण्यासाठी बहिणींना फसविण्यासाठी ही योजना सरकारने आणली आहे. आमदार रवी राणा जे बोलले ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मनातले बोलले आहेत. आमच्या बहिणी दीड हजार रुपयाला मत विकतील का? सरकारी पैसा हा रवी राणा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा आहे काय? असा संतप्त सवाल करत राज्यातील भगिनींचा अपमान करणारी सत्ताधाऱ्यांची भाषा असल्याने सरकारने बहिणींची माफी मागावी अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रवी राणा यांची खरडपट्टी काढली आहे.

### (पान १ वरून)...तर लाडकी बहीण योजनेवर बंदी घालणार !

सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. भूमी संपादनासंदर्भात या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात उद्या दुपारी होणार आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि के. विश्वनाथन यांच्या न्यायपिठासमोर या प्रकरणाची सुणावनी होत आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्यांना मोबदला देण्यासंदर्भात एक आकडा निश्चित करा. तो आकडा घेऊनच उद्या कोर्टासमोर हजर व्हा. नसता तुमची लाडकी बहीण, लाडके भाऊ या सर्व योजना आम्ही थांबवू, असा गंभीर इशारा सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिला आहे. या प्रकरणाची सुनावणी उद्या म्हणजेच १४ ऑगस्ट रोजी न्यायालयात होणार आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या या टिप्पणीमुळे या प्रकरणाची चर्चा सध्या चांगलीत रंगली आहे.

### नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी ५ वर्षे

नगराध्यक्षदाची खुर्ची रिकामी असून तो पदभारही प्रशासनाकडे आहे. त्यातच आता राज्यातील उर्वरीत नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी ५ वर्षांचा करण्यात आला आहे. राज्यात अंदाजे १०५ नगर पंचायतच्या निवडणुका अडीच वर्षापूर्वी पार पडल्याने अडीच वर्षासाठी नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले. मात्र, या नगराध्यक्षांचा कालावधी ऑगस्ट महिन्यात संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोडत आतापर्यंत निघणे आवश्यक होते. आता, सरकारने अडीच वर्षांचा कालावधी आता थेट ५ वर्षांचा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. त्यामुळे, अडीच वर्षानी नगराध्यक्षपदाचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांची मोठी निराशा झाली आहे.

**महाविकास आघाडीने घेतला होता निर्णय**

दरम्यान, राज्यातील नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय गत महायुती सरकारने घेतला होता. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगराध्यक्षांची निवड सभागृहातील नगरसेवकांकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या, तो निर्णय लागू असून अडीच वर्षांसाठी नगराध्यक्षपदाची निवड होती, ती आता ५ वर्षे करण्यात आली आहे. राज्यातील जवळपास १०५ नगरपालिकांमध्ये पुढील काही दिवसांत नगराध्यक्ष बदलले जाणार होते.

### जिल्हा पोलीस दलात मोठे फेरबदल

आली आहे. शिर्डी वाहतूक नियंत्रण शाखेतील पोलीस निरीक्षक राजेंद्र जगन्नाथ इंगळे यांची बदली एएचटीयू नगर या शाखेकडे करण्यात आली आहे. तर एएचटीयू शाखेतील पोलीस निरीक्षक नंदकुमार विष्णू दुधाळ यांची बदली पोलीस अधीक्षकांचे वाचक पोलीस निरीक्षक म्हणून करण्यात आली आहे. शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर लक्ष्मण पेन्द्राम यांची बदली सायबर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जिल्हा विशेष शाखेतील पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांची बदली नगर शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडे करण्यात आली. पोलीस अधीक्षकांचे वाचक पोलीस निरीक्षक असलेले पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण यांच्याकडे आता नगरच्या आर्थिक गुन्हे शाखेचा कार्यभार देण्यात आला आहे. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक मोहन बोरसे अकोले पोलीस ठाण्याचे नवे पोलीस निरीक्षक असतील. नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक किरण शिंदे श्रीगोंदे पोलीस ठाण्याचे नवे पोलीस निरीक्षक असतील. अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गुलाबराव राजाराम पाटील यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. श्रीगोंदे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांची देखील बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे.

पाथर्डी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांची बदली भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक योगेश राजगुरू यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. सोनई पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक आशिष परशराम शेळके यांची बदली कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कर्जत पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक विजय श्रीकृष्ण माळी यांची बदली सोनई पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षातील सहायक पोलीस निरीक्षक कुणाल सुरेश सपकाळे यांची बदली नगरच्या अर्ज शाखेकडे करण्यात आली आहे. जिल्ह्यात नव्याने आलेले सहायक पोलीस निरीक्षक रमीज हजरत मुलाणी यांना कर्जत पोलीस ठाण्यात नियुक्ती देण्यात आली. जळगाव येथून बदलून आलेले सहायक पोलीस निरीक्षक मंगेश निवृत्ती गोंटला यांना जामखेड पोलीस ठाण्यात नियुक्ती देण्यात आली. नंदूरबार येथून बदलून आलेले सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांची बदली उपविभागीय पोलीस अधीक्षक शिर्डी यांच्याकडे वाचक म्हणून करण्यात आली आहे. नगरच्या टीएमसीत कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांची बदली नगरच्या अपर पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे बदली करण्यात आली. शिर्डी पोलीस ठाण्यातून सहायक पोलीस निरीक्षक संदीप हजारे यांची बदली शिर्डीच्या वाहतूक नियंत्रण शाखेकडे करण्यात आली आहे. नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक कल्पेश आसाराम दाभाडे यांची बदली संगमनेर पोलीस उपाधीक्षक कार्यालयात करण्यात आली आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मोरे यांची बदली लोणी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. लोणी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले योगेश बाबासाहेब शिंदे यांची बदली भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात करण्यात आली. नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम रामचंद्र पवार यांची बदली बेलवंडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. एएचटीयू शाखेतील पोलीस उपनिरीक्षक प्रियंका दादासाहेब आठरे यांची बदली नगरच्या भरोसा सेलमध्ये करण्यात आली आहे. नक्षल सेलमध्ये नियुक्ती झालेले मात्र संगमनेर शहर पोलीस, पोलीस उपाधीक्षक कार्यालय, घारगाव पोलीस ठाणे येथेच कार्यरत असलेले निवांत जाधव आता शनिशिंगणापूर मंदिरामध्ये व्हीआयपींचा प्रोटोकॉल सांभाळतील. नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे यांची बदली टीएमसीमध्ये करण्यात आली आहे. नाशिक येथून बदलून आलेले पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे यांना नगरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात नियुक्ती देण्यात आली आहे. नाशिक येथून बदलून आलेले उपनिरीक्षक दीपक शेषराव पाठक यांना शेवगाव येथे पोलीस उपाधीक्षकांच्या कार्यालयात नियुक्ती देण्यात आली आहे. नाशिक येथून बदलून आलेले पोलीस उपनिरीक्षक सतीश डौले यांना श्रीरामपूर पोलीस उपाधीक्षकांच्या कार्यालयात नियुक्ती देण्यात आली. नाशिक येथून बदलून आलेले उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना सायबर पोलीस ठाण्यात नियुक्ती देण्यात आली.






# कोरडे यांना विधानसभेची संधी मिळावी

## आ. अमित गोरखे यांची अपेक्षा

**गुणोरे : प्रतिनिधी**

**भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी आपल्या पदाच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात विविध विकास कामे मार्गी लावली असून विकास कामांची जाण असलेल्या या नेतृत्वाला विधानसभेची संधी मिळाली पाहिजे अशी अपेक्षा विधानपरिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केली.**

डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून कालिकानगर येथील ५० लाख रूपये खर्चाच्या बंधारा दुरूस्ती कामाचा शुभारंभ आ. गोरखे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी काशिनाथ दाते, राहुल शिंदे, सुनील थोरात, सचिन वराळ, राजेश गोपाळे, संदीप सालके, सुभाष दुधाडे, सागर मैड, शिवाजी खिलारी, किसन शिंदे, काशिनाथ नवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

आ. गोरखे म्हणाले, लवकरच विधानसभेच्या निवडणूका होणार असून या निवडणूकांमध्ये महायुतीची सत्ता आणण्यासाठी पारनेर मतदारसंघात भाजपाच्या उमेदवाराला संधी देण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे. आपल्या विधानपरिषद सदस्यपदाच्या माध्यमातून तालुक्यासाठी निधी देण्याची ग्वाही गोरखे यांनी यावेळी दिली.



गुणोरे येथील बंधारा दुरूस्तीच्या कामाचे आ. अमित गोरखे यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले.

### ५०० ते ६०० हेक्टरला फायदा

आपण जिल्हा परिषद सदस्य असताना आपण हाच बंधारा बांधला होता मात्र अतिवृष्टीमुळे तो वाहून गेला. हा बंधारा उपयुक्त असल्याने त्यासाठी निधीची आवष्यकता होती. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी आपल्या व सचिन वराळ यांच्या मागणीस प्रतिसाद दिला आणि या कामाला मंजुरी मिळाली. या बंधाऱ्यामुळे ५०० ते ६०० हेक्टर क्षेत्राला फायदा होणार आहे.

विश्वनाथ कोरडे
मा. जि.प.सदस्य

### वाढून घेणारा माणूस सत्तेत नाही !

लोकसभा निवडणूकीत आपण परीश्रम घेऊनही आपण अपयशी ठरलो. त्याचा फटका आपल्याला बसला असून केंद्रात आपले सरकार आले असताना वाढून घेणारा माणूस सत्तेत नाही. कोण आहे याला महत्व नाही, मात्र वाढून घेणारा माणूस सत्तेत असेल तर उजवे माप मिळते असे विश्वनाथ कोरडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# प्रभाग ११ मधील भुयारी गटार योजनेचे काम पुर्णत्वास

## अर्जुन भालेकर यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**गेल्या साडेआठ वर्षांपासून प्रभाग क्र. ११ चा चेहरा मोहरा बदलण्यासाठी झटणाऱ्या अर्जुन भालेकर व मा. उपनगराध्यक्ष सुरेखा भालेकर यांनी प्रभागातील विविध भुयारी गटार योजनेची कामे मार्गी लावली आहेत.**



यासंदर्भात अधिक माहीती देताना अर्जुन भालेकर यांनी सांगितले की, या प्रभागात गटार योजनेची समस्या प्रामुख्याने होती. उघडयावर सांडपाणी साचत असल्याने आरोग्यचे प्रश्न सातत्याने निर्माण होत असत. साधारणतः साडेआठ वर्षांपूर्वी या प्रभागाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाल्यानंतर गटार योजनांची कामे मार्गी लावण्यास प्राधान्य दिले. ९० टक्के गटार योजनांची कामे मार्गी लावण्यात आल्यानंतर आता प्रभाग क्र.१० मधील लोणी रोड वसाहतीमधील दळवी सर ते लोणी रस्ता, बाबाजी शिंदे ते लोणी रस्ता, बुगे बिल्डींग ते लोणी रस्ता तसेच भालेकर बिल्डींग ते सुपा रस्ता या ड्रेनेज लाईनचे काम पुर्णत्वास गेले आहे. या कामांचे लोकार्पण लवकरच खा. नीलेश लंके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दरम्यान, स्वच्छता तसेच आरोग्यासंदर्भातील इतर कामेही लवकरच मार्गी लावण्याचे नियोजन करण्यात आल्याचे भालेकर यांनी सांगितले.

प्रभाग क्र.१५ मधील श्रीकृष्ण वसाहत ते शिवाजी वसाहतीची पारनेर महाविद्यालयालगतची ड्रेनेज लाईन फुटली होती या लाईनचीही अलिकडेच दुरूस्ती करण्यात आल्याचे अर्जुन भालेकर व डॉ. बाळासाहेब कावरे यांनी सांगितले.

### समस्यामुक्त प्रभाग करण्याचा निर्धार

नगरपंचायतीस सर्वाधिक महसूल देणारा प्रभाग म्हणून ओळख असलेल्या प्रभाग ११ ला समस्यामुक्त प्रभाग करण्याचा संकल्प असून खा. नीलेश लंके तसेच जि.प.च्या मा. सदस्या राणीताई लंके यांच्या माध्यामातून विविध कामे मार्गी लावून आदर्श प्रभागाची निर्मिती करण्यात येणार आहे.

अर्जुन भालेकर
जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# उदय शेळके फाउंडेशनच्या संकेतस्थळाचे गुरुवारी अनावरण

- खा.शरद पवारांसह मान्यवरांची उपस्थिती
- गीतांजली शेळके यांची माहिती

**निघोज : प्रतिनिधी**

**जी.एस.महानगर बँक,जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष स्व.अ‍ॅड.उदय शेळके यांच्या नावाने सुरु होणाऱ्या उदय शेळके फाउंडेशनचे बोधचिन्ह व संकेतस्थळ अनावरण सोहळा ज्येष्ठ नेते खा.शरद पवार यांच्या हस्ते गुरुवारी (ता.१५) रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडणार असल्याची माहिती महानगर व जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी दिली आहे.**

याविषयी माहिती देताना शेळके म्हणाल्या, स्व.गुलाबराव शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली जी.एस महानगर बँक, जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून काम करताना सहकार व सामाजिक क्षेत्रात स्व.अ‍ॅड.उदय शेळके यांचा नेहमी पुढाकार होता तोच सामाजिक वारसा पुढे नेण्यासाठी फाउंडेशनच्या



माध्यमातून आम्ही सुरुवात करणार आहोत. या फाऊंडेशनच्या माध्यमातुन वृक्षारोपण, युवकांना स्पर्धा परीक्षाबाबत मार्गदर्शन, सरकारी, बँकींग क्षेत्रातील नवनवीन संधी बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, माजी राज्यमंत्री आनंदराव अडसूळ, खासदार नीलेश लंके, पद्मश्री पोपटराव पवार, आमदार मोनिका राजळे, माजी आमदार सुधीर तांबे, आमदार सत्यजीत तांबे, राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर ,ज्येष्ठ नेते अरुण कडु पाटील, माजी आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार अशोक धात्रक यासंह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन महानगर बँकेच्या अध्यक्षा सुमनताई शेळके व संचालिका गीतांजली शेळके यांनी केले आहे.

# शिवसेनेच्या मागणीचा खा.लंके सकारात्मक विचार करतील

## डॉ.श्रीकांत पठारे यांचा विश्वास



**अळकुटी : प्रतिनिधी**

**खा. नीलेश लंके हे जुने शिवसैनिक असून शिवसैनिकांच्या भावना त्यांना समजत आहेत आणि आपल्या भावनांचा विचार करूनच महाविकास आघाडीतील मोठा भाऊ या नात्याने लहान भाऊ असलेल्या शिवसेनेला पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत जागा देण्याबाबत नक्कीच सकारात्मक विचार करतील व आपण लोकसभेला केलेल्या मदतीचा विचार करून आपल्याला न्याय देतील असा विश्वास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पारनेर तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी व्यक्त केला. ते भगवा सप्ताहनिमित्त आयोजित भव्य मशाल यात्रेच्या अळकुटी येथील समारोपप्रसंगी बोलत होते.**

### महाविकास आघाडीचा सुंदर संगम

खासदार नीलेश लंके यांची पाडळी आळे येथील संगमेश्वर मंदिराजवळ शिवसेनेच्या मशाल यात्रेची भेट झाली, यावेळी योगायोगाने महाविकास आघाडीचा एक सुंदर संगम झाल्याची सर्वांनी भावना व्यक्त केली. यावेळी खासदार लंके यांनी शिवसैनिकांशी मनमोकळा संवाद साधला, डॉ.श्रीकांत पठारे यांनी खासदार लंके यांचा शिवसेनेच्या वतीने सन्मान केला. खासदार लंके यांनी लोकसभेत सर्वसामान्यांचे प्रश्न मांडल्याबद्दल शिवसेनेच्यावतीने डॉ.श्रीकांत पठारे यांनी जाहीर अभिनंदन केले.

पुढे बोलताना डॉ.श्रीकांत पठारे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीदरम्यान तालुक्यात काही राजकीय घडामोडी झाल्या पण आपण सर्व शिवसैनिकांनी एकत्र येऊन ठाम निर्णय करून महाविकास आघाडीसोबतच राहून खासदार नीलेश लंके यांना पारनेर तालुक्यातून मताधिक्य मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला आणि त्यांना निवडून आणले आहे.

लोकसभा निवडणुकीदरम्यान महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेत्यांच्यासोबत झालेल्या बैठकीत खासदार लंके यांनी खासदार झाल्यावर विधानसभेची पारनेर-नगरची जागा शिवसेनेला देण्याचा शब्द दिला होता आणि त्यांचा शब्द ते कायम सार्थ करतात असाही सर्वांना अनुभव असल्याने ते महाविकासआघाडीतील मोठ्या भावाची भूमिका विधानसभेला निभावतील व शिवसेनेला संधी देण्यासाठी पुढाकार घेतील असा मला ठाम विश्वास असल्याचे मत डॉ. श्रीकांत पठारे यांनी व्यक्त केले.

यावेळी युवासेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, महिला आघाडी तालुकाप्रमुख प्रियांका खिलारी, जेष्ठ नेते डॉ.भास्कर शिरोळे, बाजार समिती संचालक किसन सुपेकर, गटप्रमुख संतोष येवले, गणप्रमुख संतोष साबळे, विभागप्रमुख सखाराम उजगरे, गटप्रमुख बाबासाहेब रेपाळे, गणप्रमुख नितीन आहेर, शेतकरी आघाडी उपतालुकाप्रमुख किसन चौधरी यासह शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अखंड हरिनाम सप्ताह कमिटीच्या अध्यक्षपदी देवराज शेंडकर

## सतीश महाराज लाळगे उपाध्यक्ष

**लोणी मावळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील अखंड हरिनाम सप्ताह कमिटीच्या अध्यक्षपदी देवराज शेंडकर यांची तर उपाध्यक्षपदी हभप सतीश महाराज लाळगे यांची निवड करण्यात आली.**

**लोणी मावळा येथे महादेव मंदिराचा भव्य दिव्य अशा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. या सप्ताहात नामवंत महाराजांची प्रवचने व कीर्तन सेवेचे आयोजन केले जाते. या सप्ताहासाठी ग्रामस्थ एकत्र येऊन सप्ताहाचे नियोजन केले जाते .यासाठी कमिटीची स्थापना करण्यात येते.या निवडीत देवराज सत्यनारायण शेंडकर यांचे अध्यक्षपदी तर**





**ह.भ.प .सतीश सदाशिव लाळगे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झालेली आहे.**


या कमिटीमध्ये सुभाष भानुदास मावळे ,स्वप्निल मावळे, राजेंद्र शेंडकर ,प्रशांत खैरे ,दिलीप शेंडकर ,अनिल शेंडकर ,बाबा कामठे ,रामकृष्ण मावळे,अमोल शेंडकर आदींची कमिटीमध्ये सदस्य म्हणून निवड करण्यात आलेली आहे. या सर्वांचे ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

लोणी मावळा परिसरात धार्मिक संप्रदाय मोठ्या प्रमाणात असून हिंदू संस्कृतीला पाठबळ देणारा हा धार्मिक संप्रदाय युवकांनी अनुकरण करीत वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे म्हणून या कमिटीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून धार्मिक संप्रदाय त्यातून होणारा सामाजिक व धार्मिक सेवाभाव यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

अध्यक्ष – देवराज शेंडकर,
उपाध्यक्ष –सतीश महाराज लाळगे.

# वृक्षारोपणासाठी तरूणांसह राबले चिमुकल्यांचेही हात!

## पळव्यातील तरूणाईचा वृक्ष लागवडीचा संकल्प पूर्ण



पळवे खुर्द येथील तरूणांनी एकत्र येत २५० झाडांच्या रोपांची लागवड करून वृक्षारोपणाचा संकल्प पुर्ण केला.

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**खरीप हंगामाच्या सुरूवातीपासून पावसाने दमदार हजेरील लावल्याने वृक्ष लागवडीसाठी पुरक स्थिती निर्माण झाल्यामुळे पळवे खुर्द येथील तरूणांनी सुमारे २५० झाडांच्या रोपांची लागवड करून आपला संकल्प पूर्ण केला. तरूणांच्या जोडीने या उपक्रमात चिमुकल्यांचे हातही राबले !**

श्री नरेंद्र महाराज यांच्या ऑनलाईन सत्संगाचे पळवे खुर्द येथे दर रविवारी आयोजन करण्यात येते. या सत्संगामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी तरूणांना प्रेरीत करण्यात येते. याच संदेशातून प्रेरणा घेऊन स्वामी सेवक तरूणांनी वृक्षारोपण करून ढासळत चाललेल्या पर्यावरणास हातभार लावण्याचा संकल्प केला होता. दमदार पावसानंतर तरूणांनी हा संकल्प पुर्ण करण्याचा निर्णय घेत चिंच करंजी, भावा, आवळा तसेच वट वृक्ष अशा २५० झाडांचे रोपण करण्याचा निर्णय घेतला. वृक्षारोपणाची मोहिम हाती घेतल्यानंतर तरूणांपासून प्रेरणा घेत बालगोपाळही या मोहिमेत उर्स्फुतपणे सहभागी झाले. या झाडांचे रोपण झाल्यानंतर त्यांचे संवर्धन करण्याचा निर्धार करण्यात आला असून प्रत्येक झाड वाचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

पळवे खुर्द येथील तरूणांनी पर्यावरणास पुरक उपक्रम हाती घेत चांगला संदेश दिला असून या तरूणांचे इतर तरूणांनी अनुकरण करून आपले गाव पर्यावरण समृध्द करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या मोहिमेत साईराज देशमुख, आदित्य देशमुख, सिध्दार्थ देशमुख, प्रणव देशमुख, संस्कार देशमुख या चिमुरडयांसह नितीन देशमुख, गणेश देशमुख, पृथ्वीराज देशमुख, सिध्दार्थ देशमुख या तरूणांनी भाग घेतला.

# पारनेर पब्लिकच्या विद्यार्थ्यांना आग व्यवस्थापनाचे धडे

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत उपक्रम

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर पब्लिक स्कुलमध्ये उद्योजक तथा समाजसेवक दशरथ बोरूडे व त्यांचे सहकारी संतोष यांनी विद्यार्थ्यांना आग व्यवस्थापनाचे धडे देत प्रात्यक्षिकेही दाखविण्यात आली.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुलमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात आगीसारख्या आपत्तीवर सहज मात करून स्वत:चे संरक्षण कसे करता येईल या हेतूने या प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दशरथ बोरूडे यांनी सांगितले की, भारतीय वायूसेनेमध्ये कार्यरत असताना ब्लूस्टार ऑपरेशन व शांतीसेना या दोन संघर्षात्मक युध्द ऑपरेशनमध्ये सहभागी होण्याची संधी आपणास मिळाली. त्यात आपल्यासह सहकाऱ्यांना आलेले अनुभव लक्षात घेऊन सेवानिवृत्तीनंतर समाजसेवा करण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार आपण आग व्यवस्थापनाचे धडे देत आपली समाजसेवा करत आहोत.

बोरूडे म्हणाले, या समाजसेवेचे यश म्हणजे आजवर अनेक लोकांना त्यातून रोजगार उपलब्ध झाला. आपण किती कमवतो यापेक्षा आपणास किती कुटूंबांचे आशीर्वाद लागतात हे महत्वाचे ठरते.



### आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

विद्यालयात आग निर्मिती करून अग्निरोधक सिलेंडरच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या सहभागातून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. अग्निरोधक सिलेंडरची पीन कशी काढावी ? आग कशी विझवावी ? याची प्रात्यक्षिके दाखविण्यात येऊन घरात किंवा सार्वजनिक ठिकाणी आग लागली तर स्वत:चे कुटूंब शेजाऱ्यांचे संरक्षण कसे करावे याचे धडे यावेळी देण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपले करीअर करताना समाजसेवेच्या माध्यमातून आपली सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे आवाहन बोरूडे यांनी केले. बोरूडे यांचे सहकारी संतोष यांनीही यावेळी मार्गदर्शन करीत आग आपत्ती व्यवस्थापनाची प्रात्यक्षिके दाखविली.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, विद्यालयाचे प्राचार्य गिताराम म्हस्के, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होमते. दीपक जाधव यांनी सुत्रसंचलन केले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com